# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा- २०१५

**क्रमांक:-** सीटीई-१४१५/सीआर- २०/२०१५/बारा **जाहिरात क्रमांक ७२/२०१५**

राज्य शासनाच्या मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व बृहन्मुंबईतील विविध कार्यालयातील लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) गट-क संवर्गातील खालील पदावरील भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, **दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५** रोजी लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा २०१५ मुंबईसह महाराष्ट्रातील ३६ जिल्हाकेंद्रावर घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

### १.१. मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील उपलब्ध पदसंख्या :- २८३ पदे

| **(१) लिपिक - टंकलेखक (मराठी)- एकूण २५५ पदे** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि. मा.प्र. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
| | २६ | ११ | ५ | ४ | २ | २ | ४० | -- | ९० | १६५ | २५५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | १३ | ५ | ३ | ३ | १ | १ | २० | -- | ४६ | ८२ | १२८ |
| (२) महिला | ८ | ३ | १ | १ | १ | १ | १२ | -- | २७ | ५० | ७७ |
| (३) माजी सैनिक | ४ | २ | १ | -- | -- | -- | ६ | -- | १३ | २५ | ३८ |
| (४) खेळाडू | १ | १ | -- | -- | -- | -- | २ | -- | ४ | ८ | १२ |
| (५) अपंग | एकूण पदे- ४ (१ )अंधत्व किंवा क्षीणदृष्टी- २ (२) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूंचा अर्धांगवायू-२ | | | | | | | | | | |
| **(२) लिपिक - टंकलेखक (इंग्रजी) - एकूण २८ पदे** | | | | | | | | | | | |
| | ३ | १ | १ | -- | -- | -- | ५ | -- | १० | १८ | २८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | २ | १ | १ | -- | -- | -- | २ | -- | ६ | ९ | १५ |
| (२) महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | -- | ३ | ५ | ८ |
| (३) माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | ३ | ४ |
| (४) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |

### १.२ बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील उपलब्ध पदसंख्या :- ११५२ पदे

| **(१) लिपिक - टंकलेखक (मराठी)- एकूण १११७ पदे** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
| | ११५ | १०३ | ५८ | ३७ | ४६ | २० | २०२ | ३० | ६११ | ५०६ | १११७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | ५८ | ५२ | २९ | १८ | २३ | १० | १०२ | १६ | ३०८ | २५३ | ५६१ |
| (२) महिला | ३४ | ३१ | १७ | ११ | १४ | ६ | ६० | ९ | १८२ | १५२ | ३३४ |
| (३) माजी सैनिक | १७ | १५ | ९ | ६ | ७ | ३ | ३० | ४ | ९१ | ७६ | १६७ |
| (४) खेळाडू | ६ | ५ | ३ | २ | २ | १ | १० | १ | ३० | २५ | ५५ |
| (५) अपंग | एकूण पदे- ८ (१)चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूंचा अर्धांगवायू-७ (२) श्रवण शक्तीतील दोष-१ | | | | | | | | | | |

| (२) लिपिक - टंकलेखक (इंग्रजी)- एकूण ३५ पदे | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | -- | ९ | ३ | १ | २ | -- | १० | १ | २६ | ९ | ३५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| (१)सर्वसाधारण | -- | ५ | २ | १ | १ | -- | ६ | १ | १६ | ५ | २१ |
| (२) महिला | -- | ३ | १ | -- | १ | -- | ३ | -- | ८ | ३ | ११ |
| (३) माजी सैनिक | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | २ | १ | ३ |
| (४) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (५)अपंग | एकूण पदे- ४- श्रवण शक्तीतील दोष-४ | | | | | | | | | | |

**२. आरक्षणाबाबत :-**

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ महिला, खेळाडू व माजी सैनिकांचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.३ वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

२.४ पात्र खेळाडूचा दावा करणा-या उमेदवारांनी त्यांना मूळ प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी आमंत्रित केल्यानंतर तपासणीकरीता येण्यापूर्वी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे संचालक, क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक राहील.

२.५ विकलांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.६ विकलांगांसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.७ विकलांगासाठी आरक्षित पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता विकलांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

२.८ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

२.९ परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा,परीक्षा शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

२.१० विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापासून ७ दिवसांच्या आत यासंदर्भात संबंधित उमेदवाराने आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने विनंती करणे अनिवार्य आहे.

**३. वेतनश्रेणी :-** रुपये ५२००-२०२००(ग्रेड पे-रुपये १९००/-) अधिक नियमानुसार भत्ते.

**४. पात्रतेच्या अटी :-**

**४.१ भारतीय नागरिकत्व.**

**४.२ वयोमर्यादा** :-

**दिनांक १ नोव्हेंबर, २०१५** रोजी किमान १८ वर्षे असावे व ३३ वर्षांपेक्षा (मागासवर्गाकरिता ३८ वर्षांपेक्षा) जास्त नसावे.

**४.३** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

**४.३.१** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

**४.३.२** अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

**४.३.३** पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

**४.३.४** माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहील.

**४.३.५** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**५. अर्हता :-**

**५.१** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण अथवा तत्सम अर्हता.

**५.२** लिपिक-टंकलेखक(मराठी) पदासाठी मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट व लिपिक-टंकलेखक(इंग्रजी) पदासाठी इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रति मिनिट.

**५.३** सदर वेगाबाबत शासकीय परीक्षा मंडळाची परीक्षा अर्ज सादर करण्याच्या विहित **अंतिम दिनांकास** म्हणजेच **दिनांक २८ जुलै, २०१५** किंवा तत्पूर्वी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५.४ माजी सैनिक उमेदवाराने वरील **परिच्छेद क्रमांक ५.२** मध्ये विहित केलेले टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल, तर त्याने शासकीय वाणिज्य संस्थेचे विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र त्याच्या शासन सेवेतील नियुक्तीच्या दिनांकापासून ११ महिन्यात सादर करणे आवश्यक राहील.

६. लिपिक - टंकलेखक पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील:-

६.१ जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय /व्यावसायिक परीक्षा

६.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६.३ संगणकाच्या ज्ञानासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९ मार्च, २००३ तसेच शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ नुसार संगणकअर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

६.४ लिपिक-टंकलेखक(इंग्रजी) पदासाठी नियुक्त होणा-या व्यक्तीला महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखक/मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली १९९१ मधील नियम ३ व ४ नुसार, एतदर्थ मंडळाची प्रति मिनिट ३० शब्द गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा शासन सेवेत प्रविष्ठ झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील .

७. **शुल्क :-**

७.१ अमागास- रुपये ५१५/- ७.२ मागासवर्गीय - रुपये ३१५/- ७.३ माजी सैनिक- १५/-

८. **अर्ज करण्याची पध्दत :-**

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येईल.

८.२ पात्र उमेदवाराला वेब आधारित (web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ८ जुलै, २०१५ ते २८ जुलै, २०१५** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

८.३ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत.

८.४ **परीक्षेचा अर्ज आयोगास सादर करतानाच अर्हतेनुसार मराठी/इंग्रजी टंकलेखक पदांचा तसेच मंत्रालयीन प्रशासकीय विभाग अथवा इतर शासकीय कार्यालयातील पदांचा पसंतीक्रम दर्शविणे आवश्यक आहे.**

८.५ विहित पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय परीक्षेसाठी उमेदवारी विचारात घेतली जाणार नाही.

८.६ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता खाली नमूद केलेल्या पध्दतींचा अवलंब करावा :-

८.६.१ मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

८.६.२ " माझे खाते "लिंक वर क्लिक केल्यानंतर **"माझे ॲप्लीकेशन"** सदरातील **"स्पर्धात्मक परीक्षा"** लिंक वर क्लिक करावे.

८.६.३ **"स्पर्धात्मक परीक्षा"** लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरण्याच्या/न भरण्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी "pay now" अशी लिंक उपलब्ध असेल.

८.६.४ "pay now " लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील :- (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाव्दारे

८.६.५ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

८.६.६ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

८.६.७ चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बॅकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

८.६.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

८.६.९ ऑनलाईन पध्दतीने **आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे.** अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

८.६.१० आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

**८.७ केंद्र निवड :-**

८.७.१ परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता " माझे खाते " मधील संबंधित पदाची निवड करावी. त्यानंतर " केंद्र निवडा " या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता इतक्या उमेदवारांचे अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

८.७.२ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

**९. प्रवेशप्रमाणपत्र :-**

९.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

९.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

९.३ परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे **आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसेन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे)** यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१०. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण,वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** तसेच **"परीक्षा"** या विभागतील **"लिपिक-टंकलेखक परीक्षा"** मध्ये उपलब्ध असलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

११. विहित पध्दतीने माहिती सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकींगव्दारे रक्कम भरण्याची कार्यवाही **दिनांक २८ जुलै, २०१५ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१२.चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २९ जुलै, २०१५** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

१३. प्रस्तुत परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१४. परीक्षेची जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in व https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

मुंबई
दिनांक :- **०८ जुलै, २०१५**

सु. ह. अवताडे
अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्यावेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासण्याच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.